**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २७ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावानं खरेदी करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.
2. आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे भारताने बालमृत्यू रोखण्यासाठी केलेले प्रयत्न अनुकरणीय- संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात गौरवोद्गार.
3. नागपूरच्या प्रधान महालेखापाल कार्यालयात आज विविध ई-प्रकल्पांची सुरवात, निवृत्तीवेतन धारकांना मिळणार दिलासा.
4. वर्धा जिल्हयातील आर्वी पाठोपाठ महावितरणच्या पिंपळगाव उपकेंद्राला ‘आयएसओ’चे मानांकन.

-------------------------

**तूर, मसूर**

तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व, किमान हमीभावानं खरेदी करण्याचा निर्णय, केंद्र सरकारनं घेतला आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री, शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत कृषी भवन इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी, केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. याकरता शेतकऱ्यांना नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. शेतकऱ्यांना तूर, मसूर आणि उडदाचा योग्य भाव मिळावा याकरता राज्य सरकारांनी प्रभावी आणि पारदर्शी खरेदी पद्धत राबवावी असं आवाहन त्यांनी केलं...

केंद्र सरकार ने फैसला किया है कि तुअर, मसूर, उड़द किसान जितना भी इसका उत्पादन करेगा, उसको मिनिमम सपोर्ट प्राइस पर खरीदा जाएगा। बस किसान को रजिस्ट्रेशन करवाना होगा।मेरी किसान भाइयों से भी अपील है और सभी राज्य सरकारों से मैं अपील करता हूँ कि तुअर, मसूर और उड़द के ठीक दाम किसानों को मिल सके। इसके लिए वो प्रभावी और पारदर्शी इन फसलों की खरीद की व्यवस्था करें और इनकी खरीदी के लिए केंद्र सरकार ने कृषि विभाग ने राज्य सरकारों को अनुमति दी है।

येत्या ४ वर्षात या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करण्याचं उद्दिष्ट अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं चालू रबी हंगामात

३७ लाख ३९ हजार टन, कड धान्यांच्या तर २८ लाख २८ हजार टन राईच्या खरेदीला मान्यता दिली आहे अशी माहिती, त्यांनी दिली. खरीपातली तूर खरेदी २ लाख ४६ हजार टन पर्यंत झाली असून त्याचा फायदा १ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र, गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगाण आणि कर्नाटकमधे हमीभावानं खरेदी सुरु असून, कर्नाटकात खरेदीची मुदत, एक मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.

---------------------------

धान बोनस

भंडारा जिल्हा हा धान उत्पादकांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असून, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सातही तालुक्यात धान शेती केली जाते. आधारभूत धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी २० हजार रुपये बोनस मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय झाला असून लवकरच बोनसची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. खरीप हंगाम २०२४ करीता जिल्ह्यातील सातही तालुक्यांमध्ये पणन विभागामार्फत २३६ धान खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. या धान खरेदी केंद्रांच्या माध्यमातून एक लाख ६५ हजार ६६४ शेतकऱ्यांनी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेली आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना निश्चितच बोनसचा लाभ मिळणार आहे.

---------------------------

प्रसारमाध्यम आणि मनोरंजन उलाढाल

देशातल्या प्रसार माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रानं २०२४ मधे सुमारे अडीच हजार अब्ज रुपयांची उलाढाल केली, तर जाहिरातीतून मिळणारा महसूल, ८ पूर्णांक एक दशांश टक्क्यांनी वाढला आहे. फिक्की आणि अर्न्स्ट अँड यंग या संस्थांनी सर्वेक्षण करुन प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती दिली. जाहीर कार्यक्रमांच्या थेट प्रसारणात १५ ट्क्के वाढ झाली तर दूरचित्रवाहिनी, चित्रपट, छापील माध्यमं आणि ऑनलाईन गेमिंगचे ग्राहक, दोन ट्क्क्यांनी कमी झाले असं या अहवालात म्हटलं आहे. चालू वर्षात या क्षेत्रात ७ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला आहे. मुंबईत आज एका कार्यक्रमात हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यावेळी उपस्थित होते. देशात प्रसार माध्यमांमध्ये सर्जनशील मजकुरात गेल्या काही दिवसात सातत्यानं वाढ होत असून, ग्रामीण आणि दुर्गम भागतले प्रतिभावंत कलाकार, जगासमोर व्यक्त होत

आहेत असं ते यावेळी म्हणाले. माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या, वेव्ज उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

--------------------------

आयुष्मान भारत

आयुष्मान भारत सारख्या योजनांद्वारे, भारतानं बालमृत्यू रोखण्यासाठी केलेले प्रयत्न, अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार, संयुक्त राष्ट्रांनी एका अहवालात काढले आहेत. आरोग्य क्षेत्रात धोरणात्मक गुंतवणूक करून, भारतानं लाखो बालकांचे प्राण वाचवल्याचं, या अहवालात म्हटलं आहे. भारतानं २००० पासून पाच वर्षांखालच्या बालकांच्या मृत्यू दरात, ७० टक्के आणि नवजात बालकांच्या मृत्यूदरात, ६१ टक्के घट करण्यात यश मिळवलं आहे. यासाठी आरोग्य सुविधांची व्याप्ती वाढवण्यात आली, पायाभूत सुविधा आणि संसाधनाच्या विकासासाठी, उपाय योजना केल्या गेल्या असंही यात म्हटलं आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रांनी आयुष्मान भारत योजनेचा दाखला दिला. या योजने अंतर्गत, प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी, साडेपाच हजार अमेरिकन डॉलरचं, संरक्षण दिलं जातं असं, या अहवालात म्हटलं आहे.

--------------------------

एस.चोक्कलिंगम

मतदार याद्यांचं निरंतर, अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया आणि प्रत्येक मतदान केंद्राकरता, राजकीय पक्षांकडून मतदान, केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नियुक्ती यासंदर्भात, राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त, एस.चोक्कलिंगम यांच्या अध्यक्षतेखाली, राज्यातल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची काल बैठक झाली. यासंदर्भात सविस्तर चर्चा करुन, सर्व राजकीय पक्षांच्या सूचनांची नोंद घेऊन, त्या अनुषंगानं कायद्यातल्या तरतूदी विचारात घेत, कार्यवाही करण्यात येईल असं, चोक्कलिंगम यांनी सांगितलं.

--------------------------

महालेखा पाल

नागपूरच्या प्रधान महालेखापाल कार्यालयात आज ई.पी.पी.ओ, ई.जी.पी.एफ. आणि ऑनलाईन ग्रीव्हियन्स रीड्रेसल सिस्टम अश्या विविध ई-प्रकल्पांच्या उद्घाटन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. प्रधान महालेखापाल, जया भगत यांच्या हस्ते हे उदघाटन, कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात पार पडलं. अनेक ई-प्रकल्पांपैकी ई.पी.पी.ओ.बद्दल त्यांनी सविस्तर माहिती देताना सांगितलं कि-

पहला जो डिजिटल इनोवेशन है, वो है इ.पी.पी.ओ. इलेक्ट्रॉनिक पेंशन पेमेंट ऑर्डर पेंशनर्स के जो ओरिजिनल पेंशन केसेस है वो उनकी डिजिटल अथॉरिटी हम निकालते हैं। तो अब ना तो केस प्रोसेस करने में विलंब है, ना कागजी। कोई ब्यूरोक्रेटिक डिले है और ब्यूरोक्रेटिक प्रॉब्लम नहीं है। पेंशनर्स को इमिजेटली इ.पी.पी.ओ.मिल जाता है और फिर स्टेट गव्हर्नमेंट महाराष्ट्र शासन की जो निवृत्ति वेतन वाहिनी वेबसाइट है, उस पर जाकर इमिजेटली वो उसको दो सेकेंड के अंदर डाउनलोड कर देते है, और उनके मोबाइल पे भी एसएमएस चला जाता है।)

याशिवाय आतापर्यंत जी.पी.एफ. धारकांना ज्या सोयी सुविधा नव्हत्या त्या ई.जी.पी.एफ. प्रणालीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे असं देखील भगत यांनी सांगितलं. या माध्यमानं संकेत स्थळावर, निवृत्ती वेतनधारक जेव्हा ई.जी.पी.एफ. वर क्लिक करतील तेव्हा त्यांना, सगळा तपशील सहज प्राप्त होऊ शकेल. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, 'ऑनलाईन ग्रीव्हियन्स रीड्रेसल सिस्टम' एजी ऑफिसनं स्वतः तयार केला आहे. या अंतर्गत सर्व तक्रारी ऑनलाइन नोंदवून, त्यांचं ऑनलाईन निराकरण करण्यात येणार आहे. यासाठी निवृत्ती वेतन धारक किंवा जी.पी.एस. सबस्क्रायबर असो त्याला केवळ आपला अधिकृत मोबाईल नंबर त्या ठिकाणी नोंदवायचा आहे. या तक्रार निवारण कक्षाच्या माध्यमातून आमच्या विभागाशी आणि तत्सम संबंधित विभागाशी संबंधित देखील जर अर्जदाराची तक्रार असेल, तर ती देखील सोडवणं शक्य होणार आहे असं भगत यांनी सांगितलं. यावेळी "पेन्शनर समाधान " हा उपक्रम सुरू करण्यात आला असून यामुळे What's up Video Discussion च्या माध्यमातून, सुविधा देऊ करण्यात आल्या आहे. या ई प्रकल्पांमुळ, महाराष्ट्र, राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होइल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला मोठ्या संख्यनं अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

--------------------------

ताडोबा-अंधारी

व्याघ्र सफरीसाठी प्रख्यात असणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात, पर्यटकांच्या सफारीचा आनंद वाढविण्यासाठी, व्यवस्थापनानं महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. दरम्यान बफरमध्ये जिप्सी करिता 'जंपिंग पॅटर्न' राबविण्यासोबत, संपूर्ण दिवस सफारीसाठी विशेष सुविधा आणि दोन गेटवर रात्री उशिरा येणाऱ्या पर्यटकांसाठी प्रवेश नियम शिथिल करण्यात आलेले आहेत. उन्हाळा बघता येत्या १५ एप्रिल ते ३० जूनपर्यंत, पर्यटनाची वेळ ही सकाळी

साडेपाच ते साडेनऊ आणि दुपारी तीन ते सात या वेळेत करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त इतर महिन्यात, वेळेमध्ये कोणताही बदल झालेला नाही.

---------------------------

आयएसओ 9001:2015

महावितरणच्या नागपूर परिमंडल अंतर्गत असलेल्या, वर्धा जिल्ह्यातील आर्वी पाठोपाठ, हिंगणघाट तालुक्यातील पिंपळगाव या, 33/11 केव्ही उपकेंद्राला आय.एस.ओ. 9001:2015 चं मानांकन मिळालं आहे. काही दिवसांपुर्वीच आर्वी इथल्या 33/11 केव्ही उपकेंद्राला देखील 9001:2015 आणि आय.एस.ओ. 45001:2018चं मानांकन मिळालं असल्यानं, आता नागपूर परिमंडलातील, दोन उपकेंद्रांनी हा बहुमान पटकाविला आहे. वर्धा जिल्ह्या अंतर्गत हिंगणघाट तालुक्यातील पिंपळगाव इथल्या या 33/11 केव्ही उपकेंद्रावरील सर्व वीज ग्राहकांना, 24X7 वीज वितरण, 33/11 केव्ही उपकेंद्र, उच्चदाब आणि लघुदाब वाहिन्या तसंच वितरण रोहीत्रांच्या ग्राहक सेवांचं संचालन आणि देखभालीसाठी, आय.एस.ओ. 9001:2015 चं मानांकन मिळालं आहे. यापुर्वी आर्वी इथल्या 33/11 केव्ही उपकेंद्राला देखील आय.एस.ओ. 9001:2015 आणि व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीसाठी, आय.एस.ओ. 9001:2015 असं मानांकन मिळालं आहे.

---------------------------